REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 6 | MARCH - 2021

# नागपूर जिल्हयातील फुटपाथवरील उपाहारगृह श्रमिकांना मिळणारे उत्पन्न, बचत व खर्चाचे विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. विजय जानराव पाठक[1] , प्राचार्य डॉ. जयदेव बी. लांजेवार[2]
[1]संशोधनकर्ता , श्रीनिकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय रेशीमबाग,नागपूर.
[2]मार्गदशक , एम्.कॉम., एम्.फिल., पीएच्. डी.
ॲड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरियल कला-वाणिज्य महाविद्यालय,
मालेवाडा, जि. गडचिरोली.

## सारांश



प्रस्तुत विषयाची व्याप्ती बरीच मोठी आहे. श्रमिकांना मिळणारे वेतन, मजूरी त्यांनी केलेली बचत, गुंतवणूक या बाबींचा अभ्यास केला आहे. प्रत्येक मनुष्य पैसा कमविण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करतांना दिसून येतो. पैशाचा आणि मनुष्याच्या विकासाचा अगदी निकटचा संबंध आहे. एका नाण्याच्या या दोन बाजू आहेत. त्यामूळेच नागपूर जिल्हयातील फुटपाथवरील उपाहारगृह श्रमिकांना मिळणारे उत्पन्न, बचत व खर्चाचे विश्लेषणात्मक अध्ययनकरतांना त्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे क्रम प्राप्त आहे. त्यांच्या आर्थिकस्थितीचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या अर्थाशी संबंधित सर्व पैलुवर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

## प्रस्तावना

भारतात शहराच्या ठिकाणी तुरळक प्रमाणात दिसणाऱ्या फुटपाथवरील उपाहारगृह (हॅाटिल) या व्यवसायाचा पुढे-पुढे सर्वत्र प्रसार होत गेला. फुटपाथवरील उपाहारगृहे ही केवळ शहराच्या समाज व्यवस्थेचा भाग नसून हा व्यवसाय गरजेनुसार सर्वत्र वाढत आहे. शहरात निवास, भोजन, फराळ, पेय इत्यादी व्यवस्था (सोई) असलेल्या अत्याधूनिक व भव्य भांडवलाच्या व्यवसायाबरोबर लहान गावामध्ये आवश्यकतेप्रमाणे फुटपाथवरील उपाहारगृह हा व्यवसाय वाढला आहे.

उन, थंडी, पाऊस असो अशा सर्व दिवशी बाराही महिने कष्ट करणारे फुटपाथवरील उपाहारगृहातील श्रमिक बहुतेक अडाणी, अकुशल अशिक्षित व असंघटित असल्यामुळे आजही त्यांना मिळणारा मोबदला (वेतन) त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहासाठी अतिशय कमी आहे. मोबदल्यात (वेतन) वाढ होत नसल्यामुळे त्यांची आर्थिक पिळवणूक तर होतेच परंतू त्यांची सामाजिक व शारीरिक पिळवणूक सुद्धा होते त्यांची कारणे कोणती, तो कोणत्या परिस्थितीत काम करतो, त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती कशी आहे. या सर्व प्रश्नांच्या जिज्ञासेवरून व आपल्यावर असणाऱ्या सामाजिक ऋणाची परतफेड करण्याच्या दृष्टीने समाजातील उपेक्षिलेला एका

देशाच्या भावी शिल्पकाराच्या अध्ययनासाठी मी आपले श्रम बहाल करीत आहे. आजच्या आधुनिक युगात त्याची स्थिती विशेष बदललेली नाही.

१९ व्या व २० व्या शतकात देशात सर्वच क्षेत्रात विकास व प्रगती झाली. त्यामुळे औद्योगिक शहरात उपाहारगृाची फार मोठ्या संस्थेने निर्मिती झाली. जस जसा शहराच्या विकास व प्रगती होत गेली तसतसे मोठ्या भांडवलदारांनी या व्यवसायात लाखो रूपयांचे भांडवल गुंतवणूक करून आधुनिक सुविधायुक्त अशा उपाहार गृहाची निर्मिती केली. त्यामुळे उपाहार गृहाच्या संख्येत आश्चर्यकारक वाढझाली. त्याच बरोबर या व्यवसायात काम करणाऱ्या श्रमिकांच्या संख्येत वाढझाली. त्यामुळे चांगला शिक्षीत व्यक्ती सुद्धा उपहार गृहाचा व्यवसाय करू लागला आहेत. आजच्या आधुनिक काळात उपाहार गृह हे जीवणाचे एक महत्वपूर्ण अंग बदले आहे. मानव समाजातील एक मोठा श्रमिक वर्ग या व्यवसायात कार्य करित आहे. या श्रमिकांच्या सामाजिक व आर्थक समस्यांचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने मी संशोधनाचा विषय म्हणून निवड केली आहे.

## उपाहार गृहाची संस्कृती

उपाहार गृह हे आजच्या आधुनिक संस्कृतीचे प्रतीक आहे. उपाहार गृहात धनिक. उच्च श्रेणीचे, शिक्षित आणि संपन्न व्यक्ती सुद्धा थांबतात. काही उपाहार गृहे आपल्या उत्तम सेवेसाठी प्रसिद्ध आहेत. उत्तम सुखसोईयुक्त उपाहार गृहात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या सुद्धा जास्त असते, ते ठीक ठिकाणी सेवेसाठी हजर असतात. उपाहार गृहाची एक स्वत:ची संस्कृती असते आणि तेथे त्यांचा एक व्यवहार असतो. प्रत्येक उपाहार गृहाचे स्वत:चे काही नियम त्यांचा एक व्यवहार असतो. प्रत्येक उपाहार गृहाचे स्वत:चे काही नियम असतात व काही परंपरा असतात. म्हणून जेव्हा प्रवासी किंवा यात्रेकरू उपाहार गृहात थांबतात तेव्हा त्यांना त्या उपाहार गृहाच्या नियमाचे पालन करावे लागते. त्यासाठी कोणत्याही नवीन यात्रेकरूंसाठी हे आवश्यक आहे की, तो ज्या उपहार गृहात प्रवेश करतो त्या सोबत त्याने तेथील नियमांची व परंपरेची माहिती घेऊनच त्या प्रमाणे वागले पाहिजे. तसेच उपाहार गृहाचे आपले काही व्यवहार असतात. त्यामुळे येणाऱ्या ग्राहकांना किंवा यात्रेकरूला त्या प्रमाणे वागावे लागते. कधी–कधी यात्रेकरूला किंवा ग्राहकाला त्याच्या मनाप्रमाणे सुविधा मिळत नाहीत, अशा स्थितीत त्याने उपहार गृहातील श्रमिकांशी किंवा व्यवस्थापकाशी वाद करण्यापेक्षा स्वत: त्या वातावरणाची समरस व्हायला पाहिजे.

यात्रेकरूला किंवा प्रवाशाला उपाहार गृहातील श्रमिकांशी तसेच व्यवस्थापकायशी सभ्यतेने वागले पाहिजे व योग्य व्यवहार करावयास पाहिजे. कोणत्याही शहरातील हॉटेल मध्ये थांबवण्यापूर्वी आपली आर्थिक स्थिती व आपल्या आचरणाला जे वातावरण पाहिजे अशा प्रकारच्या उपाहार गृहाची निवड करावयास पाहिजे. साधारणत: आपण पाहतो की, गुजराती, राजस्थानी, बंगाली, मद्रासी व्यक्ती अशी उपाहार गृहाची निवड करतात जेणे करून त्यांच्या भाषेचे, जातीचे किंवा समाजाचे व आपल्या अनुरूप जेथे जेवण मिळेल अशाच उपाहार गृहाची ते निवड करतात. भाषेची सुद्धा एक महत्वपूर्ण भुमिका आहे. कारण की, मद्रासी, राजस्थानी, गुजराती, बंगाली व इतर समाजाच्या लोकांची अलग–अलग संस्कृती आणि व्यवहार असतात. त्यामुळे आपल्या जातीच्या व आपली भाषा बोलणाऱ्या उपाहार गृहात थांबणे इष्ट समजतात. उदा. मद्राती, राजस्थानी, गुजराती, बंगाली लोक आपल्या जातीच्या किंवा भाषेच्या लोकांद्वारे उघडलेल्या उपाहार गृहात थांबणे उचित समजात त्यामुळे तेथे त्यांना भाषेची अडचण जात नाही व जेवण सुद्धा त्यांच्या आवडीचे किंवा त्यांच्या अनुरूप प्राप्त घेऊ शकते. म्हणून उपाहार गृहाची निवड करतांना सर्व गोष्टी समोर ठेवून त्याप्रमाणे उपाहार गृहाची निवड केली पाहिजे. तसेच युरोपीय लोकांद्वारे उघडलेलया हॉटेल मध्ये

साधारणत: भारतीय लोक थांबणे पसंत करीत नाहीत. पण ज्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे असे लोक त्या उपाहार गृहात थांबतात कारण त्यांना तेथे भाषेची अडचण जात नाही. त्यानंतर भाषेच्या आधाराने ते युरोपीय पद्धती व व्यवहार शिकून घेतात व आपल्यास त्या अनुरूप बनवून घेतात. सध्याच्या आधुनिक युगात आधुनिक उपाहार गृहात युरोपीय सभ्यता व रीतीरिवाज आणि व्यवहार सामान्यपणे आढळून येतात. यावरून असे दिसून येते की, जर उपाहार गृहाची संस्कृती व तेथील व्यवहार आणि वातावरणानुसार जी व्यक्ती आपणास बदलून घेईल तीच तेथील सुखसोईचा जास्तीत जास्त लाभ घेऊ शकेल.

नागपूर जिल्हयातील फुटपाथवरील उपाहारगृह श्रमिकांना मिळणारे वार्षिक उत्पन्न (आय) किती आहे ? याचा अभ्यास करण्याकरीता माहिती गोळा केली असता खालील आकडेवारी प्राप्त झाली.

| उत्पन्न वार्षिक | कुटुंबाची संख्या | प्र. श. प्रमाण |
|---|---|---|
| १५,००० ते २५,००० | १४७ | २१.००% |
| २५,००० ते ३५,००० | १५२ | २१.७१% |
| ३५,००० ते ४५,००० | १८६ | २६.५७% |
| ४५,००० ते ५५,००० | ११२ | १६.००% |
| ५५,००० ते ६५,००० | ४५ | ६.४३% |
| ६५,००० ते ७५,००० | २४ | ३.४३% |
| ७५,००० ते ८५,००० | १४ | २.००% |
| ८५,००० ते ९५,००० | १२ | १.७१% |
| ९५,००० ते १०५,००० | ०७ | १.००% |
| १०५,००० पेक्षा अधिक | ०१ | ०.१४% |
| | ७०० | १००% |

आधार :- प्रश्नावलीचे वर्गीकरण

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ७०० उत्तरदात्यापैकी १५,००० ते २५,००० रू. पर्यत उत्पन्न असणारे १४७ (२१.००%) कुटूंब आहेत, २५,००० ते ३५,००० रू. पर्यंत उत्पन्न करणारे १५२ (२१.७१%) कुटुंब आहेत. ३५००० ते ४५,००० रू. पर्यत उत्पन्न असणारे १८६(२६.५७%) कुटुंब आहेत. ४५,००० ते ५५,००० रू. उत्पन्न असणारे ११२ (१६.००%) कुटुंब आहेत. ५५,००० ते ६५,००० उत्पन्न असणारे ४५ (६.४३%) कुटुंब आहेत. ६५,००० ते ७५,००० रू. उत्पन्न असणारे २४ (३.४३%) कुटुंब आहेत. ७५,००० ते ८५,००० रू. उत्पन्न असणारे १४ (२.००%) कुटुंब आहेत. ८५,००० ते ९५,००० रू. उत्पन्न असणारे १२ (१.७१%) कुटुंब आहेत. ९५,००० ते १०५००० रू. उत्पन्न असणारे ०७ (१. ००%) कुटुंब आहेत. तर १०५००० रू. पेक्षा अधिक उत्पन्न असणारे फक्त एक कुटुंब आहे.

यावरून स्पष्ट होते की, १५००० ते ५५००० रू. पर्यत उत्पन्न कमविणारे एकूण ५९७ कुटुंब आहेत. म्हणजेच ८५.२९% कुटुंबाचे उत्पन्न प्रतिवर्ष ५५००० पेक्षा कमी म्हणजेच मासिक ४५०० रू. पेक्षा कमी आहे. त्यामुळे त्यांच्या कौटुंबिक मुलभूत गरजा सुद्धा त्यांना पूर्ण करता येत नाही अशा कुटूंबातील सदस्यांना गलीच्छ वस्तीत राहणे भाग पडते. यावरून गरीबी हेच त्यांच्या दयनिय अवस्थेचे मुख्य कारण असल्याचे स्पष्ट होते.

## आर्थिक बचत व बचतीचे स्त्रोत :-

नागपूर जिल्हयातील फुटपाथवरील उपाहारगृह श्रमिककाही आर्थिक बचत करतात का ? व बचत करत असतील तर कुठे कुठे करतात? हे अभ्यासण्यासाठी प्रयत्न केले असता खालील आकडेवारी प्राप्त झाली.

| बचत न करणारे | | | |
|---|---|---|---|
| **कमी उत्पन्नामूळे** | अज्ञान व अविश्वास | नेहमी कर्जात असल्यामूळे | **एकूण** |
| १५२ | १३५ | १४२ | ४२९ |
| २१.७१% | १९.२९% | २०.२९% | ६१.२९% |

| बचत करणारे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पोस्ट ऑफीस** | सह. क्रे. को. ऑप सोसा. | सहकारी बॅक | राष्ट्रीयकृत बॅक | बचत प्रमाणपत्र | सोनं चांदी | घरीच | **एकूण** |
| ३५ | ७९ | ४६ | ८७ | – | ०६ | १८ | २७१ |
| ५.००% | ११.२९% | ६.५७% | १२.४३% | – | ०.८६% | २. ५७% | ३८. ७१% |

## आधारप्रश्नावलीचे वर्गिकरण

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ७०० उत्तरदात्यांपैकी ४२९ (६१.२९%) कुटूंबात बचत केली जात नाही. या बचत नकरण्यामागची कारणे पूढील प्रमाणे आहेत. १५२(२१.७१%) उत्पन्न कमी असल्याने बचत करीत नाहीत. १३५(१९.२९%) अज्ञानामूळे किंवा विश्वास नसल्यामूळे ऐजंटकडे पैसे द्यायला तयार नाहीत. १४२(२०.२९%) नेहमी कर्जात असल्यामूळे किंवा बचतीसाठी पैसा शिल्लक नसल्यामूळे बचत करीत नाही. २७१(६१.२९%) विविध ठिकाणी बचत करीत आहेत. त्यापैकी ३५(५.००%) पोस्ट ऑफीस मधील सावधी बचत (आर. डी.) खात्यात, ७९ (११.२९%) सहकारी क्रे. को. ऑ. सोसा. च्या सावधी बचत खात्यात बचत करीत आहेत. ४६(६.५७%) लोक सहकारी बॅकेतील बचत खात्यात, तर ८७ (१२.४३%) राष्ट्रीय बॅकेतील बचत खात्यात, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र, किसान विकास पत्र, सेअर्स, बॉन्डसं किंवा इतर बचत प्रमाण पत्र कोणीही खरेदी केलेले नाहीत. ०६(०.८६%) लोक सोने चांदी खरेदी करून ठेवत आहेत. तर १८(२.५७%) लोक घरीच रक्कम जमा करून ठेवत आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की ८०% लोकांना बचत करावी असे वाटते पण कमी उत्पन्नामूळे, नेहमी कर्जात असल्यामूळे बचत करीत नसतात. ३८.७१% लोक आर. डी. मध्ये, बचत खात्यात पैसा जमा करीत असतात. बचत आपल्या कामात येईल हे त्यांना समजते पण मुलभूत गरजा पूर्ण होत नसल्याने तर विविध कारणांनी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी खर्च होत असल्यामूळे हे लोक बचत मोठया प्रमाणात करू शकत नाही.

## बचतीची कारणे :-

नागपूर जिल्हयातील फुटपाथवरील उपाहारगृह श्रम करण्यारे ६१.२९%लोक बचत करीत नाहीत ३८.७१%लोक आर्थिक बचत विविध संस्थामध्ये करीत असतात. ती बचत करण्याची कारणे कोणती याचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने माहिती संकलीत केली असता खालील आकडेवारी प्राप्त झाली. यात फक्त बचत करणाऱ्या उत्तरदात्यांचाच विचार करण्यात आला आहे.

| विवरण | कर्जाची परत फेड करण्यासाठी | नविन कर्ज घेण्यासाठी | आपत्तीच्या वेळी उपयोग व्हावे म्हणून | एखादे कार्य पूर्ण करण्यासाठी | अभिकर्ता म्हणतो म्हणून | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | १३१ | ९३ | १८ | १५ | १४ | २७१ |
| प्र.श प्रमाण | ४८.३४% | ३४.३२% | ६.६४% | ५.५४% | ५.१६% | १००% |

आधार :- प्रश्नावलीचे विश्लेषण

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, ७०० उत्तरदात्यातील बचत करणाऱ्या २७१ उत्तरदात्यापैकी १३१ (४८.३४%) जूने कर्ज परत करण्यासाठी बचत करीत आहेत. ९३ (३४.३२%) नविन कर्ज मिळावे या करिता बचत करीत आहेत. १८ (६.६४%) भविष्यात येवू शकणाऱ्या आपत्तीला तोंड देण्यासाठी बचत करीत आहेत. १५ (५.५४%) एखादे कार्य पूर्ण करावयाचे आहे म्हणून बचत करीत आहेत. तर १४ (५.१६%) अभिकर्ता (एजेंट) जवळचा आहे, तो आग्रह करतो म्हणून बचत करीत आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, बचत करण्याच्या स्थितित फुटपाथवरील उपाहारगृह श्रम करण्यारे श्रमिकनाहीत परंतू कर्ज परत करायचेच आहे किंवा नविन कर्ज घ्यायचे आहे म्हणून ८२.६६%लोक बचत करतात. १२.१८% तर लोक भविष्यासाठी बचत करतात. ५.१६% लोक अभिकर्त्याच्या आग्रहामूळे बचत करतात.

## निष्कर्ष

नागपूर जिल्हयातील फुटपाथवरील उपाहारगृह श्रम करण्यारे श्रमिक उत्पन्नापेक्षा खर्च अधिक आहे. उत्पन्नाची अल्प साधने, अल्प मुजूरी दर, अधिक गरजा, मोसमी स्वरूपाचे रोजगार, अल्प उत्पन्न, व्यसने इत्यादी कारणामुळे हे लोक बचत करू शकत नाही. परंतू कर्ज शोधनासाठी, कर्ज घेण्यासाठी, सामाजिक कार्यासाठी त्यांना तरतूद करावी लागत असते. अर्यादित कार्यक्षमता, अकुशलता, वैशिष्टचीकरणाचा अभाव, औदयोगिकरणाचा अभाव, श्रमाचा अतिरिक्त पुरवठा इत्यादीमुळे भरपुर रोजगार व जास्तीत मजूरी दर मिळत नाही ज्यामुळे अधिक प्राप्ती या लोकांना होत नाही. त्यामुळे त्यांना गरीबीचे जीवन जगावे लागते. गरजा पूर्ण करण्यासाठी, भविष्यासाठी किंवा कर्ज परत करण्यासाठी त्यांना विविध ठिकाणाहुन कर्ज घ्यावे लागते. अनाधिकृत सावकारांकडून अधिक लोक कर्ज घेतात. यावर बहिशेबी व्याज देतात. त्यामुळे ते आपले पूर्ण उत्पन्न कुटूंबाच्या गरजांवर खर्च करू शकत नाही.

## संदर्भ


- वैद्य एन.बी., विदर्भाची अर्थव्यवस्था, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००३

- कडवेकर वि., कोठावदे. र., व्यवसायिक पर्यावरण आणि उद्योजकता, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पहिली आवृत्ती २००६
- डॉ. मुकूंद महाजन, भारतीय अर्थरचना, निराली प्रकाशन, पुणे (१९९८)
- डॉ. मुकूंद महाजन, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, निराली प्रकाशन, पुणे (२००७)
- डॉ. कायंदे पाटील, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक (२००१)
- प्रा. डॉ. आर. डी. जाधव, आर. जी. अघाव, टी.जी.गीते, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, अथर्व पब्लिकेशन्स, पुणे (२००६)
- डॉ. सौ.इंदूरकर, भारतीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर (२०००)
- डॉ. र. पु. कुरलकर, भारतीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर (१९९३)
- प्रा. एन. एल. चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग १, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (२००३)
- प्रा. एन. एल. चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग २, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (२००४)
- प्रा. एन. एन. चव्हाण, भारतीय अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (२००९)
- देसाई–भालेराव, भारताची आर्थिक समस्या १ व २, निराली प्रकाशन.
- डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. प्राची देशपांडे, श्रम अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर (२००२)
- डॉ. बुरंगे चपळगावकर, भारतीय अर्थव्यवस्था, नरेंद्र प्रकाशन, पुणे (१९९२)
- देव झायटे, भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (१९९९)
- पी.वी.राजीव (महावीर प्रसाद महाराज), भारत एक नया अध्याय – आर्थिक व सामाजिक परिवर्तन के परिक्षेत्र में, राधा पब्लिकेशन्स (२००१), नई दिल्ली.
- ओ. पी. शर्मा, भारतीय अर्थव्यवस्थेची दिशा, आर. बी. पब्लिशर्स, जयपूर (२००१)
- ओ. पी. शर्मा. भारतीय अर्थव्यवस्था की आधुनिक प्रवृत्तीयाँ, सबलाईस पब्लिकेशन्स, जयपूर (१९९९)
- डॉ. सुदामा सिंग एवं डॉ. राजीव कृष्ण सिंग, भारतीय अर्थव्यवस्था, राधा पब्लिकन्स, नई दिल्ली (२००३)
- कमल नयन काबरा, भारतीय अर्थव्यवस्था एक वैकल्पिक आकलन, प्रकाशन संस्थान, नई दिल्ली (२००३)
- रूद्र दत्त तथा के. पी. एम. सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था (४५ वां संस्करण २००९), एस. चंन्द एन्ड कंपनी लि. नई दिल्ली
- झिंगन, विकास का अर्थशास्त्र एवं नियोजन, कोनार्क पब्लिकर्शन्स, दिल्ली (१९९७).
- मानक इंग्रजी हिंदी शब्दकोष – हिंदी साहित्य सम्मेलन प्रयोग, लेखक सत्यप्रकाश और बलभद्रप्रसाद मिश्र– पान ६६३.
- मानक हिंदी शब्दकोष – प्रकाशक – हिंदी साहित्य सम्मेलन प्रयोग – श्री रामचद्र वर्मा. पृ. क्र. ३७२.
- मुंबई दुकाने आणि संस्था अधिनियम, १९४८, प्रकाशन – गो. य. राणे. पुणे. लेखक – नारायण धोंडापंत उपाध्ये, आणि विनायक नारायण उपाध्ये, पान – ६–७.


- मुंबई दुकाने आणि संस्था अधिनियम, १९४८, प्रकाशन – गो. य. राणे. पुणे. लेखक – नारायण धोंडापंत उपाध्ये, आणि विनायक नारायण उपाध्ये, पान – ६–७.